खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

### मराठी विभाग : विकिपीडिया कार्यशाळा

POSITIVE NEWS!

राजगुरूनगर

मराठी विकिपीडिया समृद्धीची जबाबदारी



# राजगुरू महाविद्यालयात मराठी विकिपीडिया परिचय कार्यशाळा

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**राजगुरूनगर :** मराठी विकिपीडिया समृद्ध करणे ही मराठी भाषकांची जबाबदारी असून प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी मराठी विकिपीडियावर लेखक म्हणून सहभागी व्हावे आणि आपापल्या क्षेत्रातल्या ज्ञानाची माहिती समाजाला करून द्यावी, असे आवाहन पाबळ विज्ञान आश्रमातील संगणक प्रशिक्षिका प्रियंका जाधव यांनी केले. येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित एक दिवसीय मराठी विकिपीडिया परिचय कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

याप्रसंगी संगणक प्रशिक्षिका प्रियंका चौधरी, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. रुपाली वायाळ व प्रा. अपर्णा कुलकर्णी उपस्थित होत्या. या कार्यशाळेत मराठी विषयाच्या ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

प्रियंका जाधव यांनी चित्रफितीच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुक्त ज्ञानकोश असलेल्या मराठी विकिपीडियावर आपल्या आजूबाजूची अधिकृत माहिती व फोटो कसे अद्ययावत करावी, याची माहिती त्यांनी दिली. प्रियंका चौधरी यांनी विकिपीडियावर लेख लिहिण्यासाठीच्या संगणकीय ज्ञानाची माहिती दिली. विकिपीडियाचे माध्यम सर्वांसाठी मोफत असून विद्यार्थ्यांनी त्यावर मुक्तपणे लेखन करावे, असे सांगितले. कार्यशाळेतील सहभागी इच्छुक विद्यार्थ्यांना 'विकिपीडिया' अकौंट काढून देण्यात आले. डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविकात विद्यार्थी -प्राध्यापकांसह सामाजिक भान असलेल्या व्यक्तींनी आपल्या मराठी भाषेवरचं प्रेम अर्थपूर्ण पद्धतीने व्यक्त करण्यासाठी मराठी विकिपीडियावर लेखक म्हणून व्यक्त होण्याचे आवाहन केले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

पुण्य नगरी

# राजगुरू महाविद्यालयात विकिपीडिया कार्यशाळा

**शिरोली** : मराठी विकिपीडिया समृद्ध करणे ही मराठी भाषकांची जबाबदारी असून प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी मराठी विकिपीडियावर लेखक म्हणून सहभागी व्हावे आणि आपापल्या क्षेत्रातल्या ज्ञानाची माहिती समाजाला करून द्यावी, असे आवाहन पाबळ विज्ञान आश्रमातील संगणक प्रशिक्षिका प्रियंका जाधव यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित एक दिवसीय मराठी विकिपीडिया परिचय कार्यशाळेत त्या बोलत होत्या. या प्रसंगी संगणक प्रशिक्षिका प्रियंका चौधरी, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. रुपाली वायाळ व प्रा. अपर्णा कुलकर्णी उपस्थित होत्या. या कार्यशाळेत मराठी विषयाच्या ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रियंका जाधव यांनी चित्रफितीच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रियंका चौधरी यांनी विकिपीडियावर लेख लिहिण्यासाठीच्या संगणकीय ज्ञानाची माहिती दिली.

Smart Pimpri Chinchwad Edition
Oct 21, 2023 Page No. 1
Powered by : eReleGo.com

## राजगुरू महाविद्यालयात मराठी विकिपिडिया परिचय कार्यशाळा

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

मराठी विकिपिडिया समृद्ध करणे, ही मराठीभाषकांची जबाबदारी असून, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी मराठी विकिपिडियावर लेखक म्हणून सहभागी व्हावे आणि आपापल्या क्षेत्रातल्या ज्ञानाची माहिती समाजाला करून द्यावी, असे आवाहन पाबळ विज्ञान आश्रमातील संगणक प्रशिक्षिका प्रियंका जाधव यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित एकदिवसीय मराठी विकिपिडिया परिचय कार्यशाळेत त्या बोलत होत्या. या प्रसंगी संगणक प्रशिक्षिका प्रियंका चौधरी, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्रा. रूपाली वायाळ, प्रा. अपर्णा कुलकर्णी उपस्थित होते. या कार्यशाळेत मराठी विषयाच्या ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रियंका जाधव यांनी चित्रफितीच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुक्त ज्ञानकोश असलेल्या मराठी विकिपिडियावर आपल्या आजूबाजूची अधिकृत माहिती व फोटो कसे अद्ययावत करावे, याची माहिती त्यांनी दिली. प्रियंका चौधरी यांनी विकिपिडियावर लेख लिहिण्यासाठीच्या संगणकीय ज्ञानाची माहिती दिली. विकिपिडियाचे माध्यम सर्वांसाठी मोफत असून, विद्यार्थ्यांनी त्यावर मुक्तपणे लेखन करावे, असे सांगितले. उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविकात मराठी भाषेवरचे प्रेम अर्थपूर्ण पद्धतीने व्यक्त करण्यासाठी मराठी विकिपिडियावर लेखक म्हणून व्यक्त होण्याचे आवाहन केले. कार्यशाळेतील सहभागी इच्छुक विद्यार्थ्यांना विकिपिडिया अकाउंट काढून देण्यात आले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Oct 19, 2023 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**